# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५

ई–मेल– pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ क्र. :पुवि/निवि /१०६९

दिनांक : २१.०९.२०१२

प्रति,

मा.विभागप्रमुख सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ
मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये,
मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– वार्षिक अहवाल सन २०११– १२ व सांख्यिकी माहिती पाठविणेबाबत..**

संदर्भ :– १. पुवि/निवि/८०३ दिनांक १४/०७/२०१२
२. पुवि/निवि/९६७ दिनांक २१/०८/२०१२

महोदय/महोदया,

नियोजन व विकास विभागास विद्यापीठ वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी, तसेच सांख्यिकी कक्षास शासनाकडे वेळोवेळी पाठवावी लागणारी सांख्यिकी माहिती सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ विभाग यांचेकडून संकलित करावी लागते.

वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी विधीमंडळाच्या सभा पटलावर ठेवावा लागत असल्याने व शासनाकडे पाठवावयाची सांख्यिकी माहिती परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ विभाग यांनी माहिती पाठवावी असे आपणांस वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे. तरी देखील आपणाकडून याबाबत माहिती पाठविण्याची दखल घेतलेली दिसत नाही. याबाबत मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**म : २४५/१२०९१२**

**असा ठराव करण्यात येतो की, विद्यापीठ कार्यालयाने वेळोवळी मागविलेली माहिती न देणे ही गंभीर बाब असल्याने यापुढे मागविलेली माहिती वेळेत देणे अपेक्षित आहे. अन्यथा महाविद्यालयाकडून येणारे संलग्नीकरणाचे नुतनीकरणाचे किंवा तत्सम प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. सदर प्रस्ताव सादर करताना विद्यापीठाने मागविलेली माहिती विद्यापीठास सादर केल्याच्या पोचपत्राची प्रत सादर करणे प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेवर बंधनकारक राहील.**

तरी ज्या संलग्न महाविद्यालयांनी, मान्यताप्राप्त संस्थेने व विद्यापीठ विभागांनी अद्याप माहिती पाठविलेली नाही त्यांनी सदरील माहिती ताबडतोब नियोजन व विकास विभाग व सांख्यिकी कक्ष यांचेकडे पाठवावी व विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे.

उपकुलसचिव
नियोजन व विकास

Local f/Annual report 2011-12/Letter